## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ९४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०८/०२/२०१७

**१) घराचा कोंडा तोडुन आत प्रवेश करुन सोन्याचे दागीने व चांदीच्या सामानाची चोरी . :—**

दिनांक ०६/०२/२०१७ चे १०.३० ते १६.०० वा. दरम्यान. यातील फिर्यादी श्रीमती अश्विनी अविनाश पातुरकर वय ५९ वर्ष रा. प्लॉट नं. २ राधे कॉम्पलेक्स विघ्नहर्ता चे वरती सहकार नगर भंडारा ही आपल्या घराला ताला लावुन डयुटीवर गेली असता कोणीतरी अज्ञात चोराने घराचे समोरील दाराचा कडी व कोंडा तोडुन आत प्रवेश करुन बेडरुम मधील लाकडी आलमारीत ठेवलेला १ सोन्याचा लक्ष्मी हार १७.५ ग्रॅम, १ सोन्याचा लवंग डिझाईन असलेलं कानातील १ जोड ०.५ ग्रॅम, चांदीचे ३ सिक्के १० ग्रॅम, असा एकुण ४१,२००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,३८० भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. तोडासे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) विषारी औषध प्राशन केल्याने इसमाचा मृत्यु . :—**

दिंनाक ०७/०२/२०१७ रोजी १७.३० वा. दर. यातील मृतक संदीप नामदेव राखडे वय ३६ वर्ष, रा. कपील नगर तकीया वार्ड भंडारा याने विषारी औषध प्राशन केल्याने त्यास औषधोपचारा करीता सामान्य रुग्णालय भंडारा येथे आनले असता डॉ. ने तपासुन मृत घोषीत केल्याने डॉ. मेमो वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे १७४ कलम जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कन्नाके पो. स्टे. भंडारा हे करीत आहे.

**३) जळाल्याने औषधोपचारा दरम्यान युवकाचा मृत्यु . :—**

दिंनाक ०७/०२/२०१७ रोजी ००.३० वा. दर. यातील मृतक समीत देवीदास कानसे वय २५ वर्ष, रा. मुरमाडी तुपकर हा जळाल्याने त्या औषधोपचारा करीता त्यास दि. २३/०१/२०१७ ला सा. रु. भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ क. १७४ जाफौ. चे कागदपत्र पो. स्टे. ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी मपोना. फुलसुंगे पो. स्टे. पालांदुर याचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे १७४ कलम जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कन्नाके पो. स्टे. पालांदुर हे करीत आहे.

**४) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक ०७/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ६९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक ०१ केसेस, तीन सिटर वाहनांवरती १७ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ५१ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.